मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# गो-संवर्धनासाठी ओंकारेश्वराची महाआरती!

## गो-रक्षकांच्या मागण्यांसाठी पाठपुरावा करणार : कॅबिनेट मंत्री नितेश राणे, आमदार लांडगे यांची उपस्थिती



**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यात गोहत्या बंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि गोरक्षकांच्या मागण्यांसाठी महायुती सरकारकडे पाठपुरावा करणार आहोत. तसेच, या पुढील काळातही गोसंवर्धनासाठी शेती-माती-संस्कृतीसाठी कटिबद्ध आहोत. कायदा असतानाही गोहत्या केली जात असेल, तर भगवाधारी महायुतीच्या सरकारमध्ये कुणाचेही लांगुलचालून करु देणार नाही. कायदा प्रत्येकाला पाळावा लागेल, असा इशारा राज्याचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांनी दिला आहे.

महाराष्ट्रात महादेवाच्या नंदींचे व गोमातेच्या रक्ताचे वाहणारे पाट थांबवून शेतकरी समृद्ध व्हावेत. यासाठी पुण्याचे आराध्य दैवत भगवान श्री. ओंकारेश्वराच्या प्राचीन मंदिरात महाआरती करण्यात आली.

राज्यातील गोरक्षक, गोभक्त आणि गोसेवकांच्या वतीने महादेवासमोर गोरक्षण व गोसंवर्धनासाठी संकल्प केला. यावेळी राज्याचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे, आमदार महेश लांडगे आणि मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये महाआरती संपन्न झाली. महाआरतीचे नियोजन गोरक्षक शिवशंकर स्वामी, सोमनाथ भोसले यांनी केले होते.

### महाराष्ट्राला कत्तलखानामुक्त करणार..

» कॅबिनेट मंत्री नितेश राणे म्हणाले की, गोमातेकडे कुणीही वाकड्या नजरेने बघण्याची हिंमत होणार नाही. हिंदू म्हणून थाटात फिरा. कुणाला घाबरण्याची आवश्यकता नाही. जो अधिकारी गाईच्या कत्तलीला प्रोत्साहन देत असेल, त्याचे फक्त नाव द्या. गाईला राज्यमातेचा दर्जा देणारे महायुती सरकार आहे. गोरक्षकांनी आता चिंता करण्याची आवश्यकता नाही. गोहत्या बंदीचा कायदा आणखी कडक करण्यासाठीसुद्धा आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी करणार आहोत. आगामी काळात महाराष्ट्राला कत्तलखानामुक्त करणार आहोत, असेही नितेश राणे यांनी म्हटले आहे.

“ आमची सगळी मुलं गोरक्षणासाठी दिवस रात्र पळत आहेत. हिंदुत्वाचा विचार जपत गो-सेवक नि:स्वार्थपणे काम करीत आहेत. हिंदू धर्मातील आठरा पगड जाती, बारा बलुतेदार या सर्वांना सोबत घेवून देव-देश अन् धर्म रक्षणासाठी कटिबद्ध आहोत. गोमातेच्या रक्षणासाठी जीव धोक्यात घालून काम करणारे गोरक्षक यांच्या पाठीशी महायुती सरकार राहणार आहे.

- महेश लांडगे, आमदार, भाजपा.

---

# अवैध मद्यविक्री रोखण्यासाठी यंत्रणा सज्ज

## सार्वजनिक ठिकाणी पोलिसांकडून विशेष गस्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

नववर्षाच्या स्वागतासाठी पुणे, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्यातील रेस्टो-बार पहाटे पाच वाजेपर्यंत खुले ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. नववर्षाच्या जल्लोषासाठी विविध ठिकाणी खास पार्ट्यांचे आयोजन करण्यात येणार असून, मद्यविक्री मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शहरभर कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे, जेणेकरून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही.

कर्कश आवाज करणारे किंवा ट्रिपल सीट वाहन चालवणाऱ्यांवरही पोलिस तातडीने कारवाई करतील. नववर्षाच्या जल्लोषात सार्वजनिक ठिकाणी अराजकता माजवणाऱ्यांवर करडी नजर ठेवण्यात येणार आहे.



शहरात सुरक्षेसाठी 1 पोलिस आयुक्त, 6 सहायक आयुक्त, 46 पोलिस निरीक्षक, 154 उपनिरीक्षक, 1520 अंमलदार, 8 स्टायकिंग पथके, 70 वॉर्डन आणि 5 एसआरपीएफ पथक तैनात करण्यात आले आहेत.

नववर्षाच्या उत्सवात ध्वनिप्रदूषण होऊ नये, यासाठी पोलिसांनी खास खबरदारी घेतली आहे. अशा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

नववर्षाच्या निमित्ताने धार्मिक स्थळे, मॉल्स, हॉटेल्स, लॉजेस आणि सार्वजनिक ठिकाणी पोलिसांकडून विशेष गस्त घालण्यात येणार आहे. महत्त्वाच्या ठिकाणी नाकाबंदी पॉईंट्सवर वाहनांची तपासणी केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तातडीने कारवाई केली जाईल. मद्यप्राशन करून वाहन चालवणारे, भरधाव वेगाने गाडी चालवणारे किंवा सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणाऱ्यांवर पोलिसांचे लक्ष असेल.

# ‘हॅपिनेस स्ट्रिट’ उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## माजी उपमहापौर डब्बू आसवानी यांच्यावतीने आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

नागरिकांनी आपल्या आरोग्याविषयी जागरूक राहावे, यासाठी पिंपरी येथे हॅपिनेस स्ट्रिटचे आयोजन करण्यात आले होते. माजी उपमहापौर डब्बू आसवानी यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाची सुरुवात डब्बू आसवानी यांच्या निवासासमोर आरोग्याविषयीची मशाल पेटवून झाली. या उपक्रमाला पिंपरीतील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

पिंपरीतील ‘ड’ प्रभाग शाळेजवळील खुल्या मैदानात या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी योगा, झुंबा, गाणे, नृत्य, लुडो, लाईव्ह म्युझिक यांच्यासारख्या



विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व वयोगटासाठी विविध स्पर्धा घेऊन विजेत्यांना बक्षिसेही देण्यात आली.

या संकल्पनेच्या यशस्वी आयोजनासाठी पवन भोजवानी, सुरज धरनानी, मनीष गिरजा, अविनाश इस्त्रानी, शोभा फिटनेस क्लब, मधू जुमानी स्टुडीओ, स्वरांश बँड यांनी सहकार्य केले. पहिल्याच दिवशी दोन हजार नागरिकांनी या उपक्रमात सहभाग घेतला. आपले आरोग्य हीच आपली संपत्ती आहे त्यामुळे खुश रहा हा संदेश डब्बू आसवानी यांनी या उपक्रमाद्वारे दिला.

# अखेर वाल्मिक कराड पोलिसांना शरण

## अटक केल्यानंतर वाल्मिक कराड यास केज न्यायालयासमोर हजर करणार

**पुणे | प्रतिनिधी**

बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात फरार असलेला वाल्मिक कराड हा पुण्यात सीआयडीला शरण आला आहे. यामुळे पुण्यातील CID मुख्यालयाबाहेर पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला होता. तसेच मुख्यालय परिसरात धनंजय मुंडे समर्थकही जमू लागले होते.

मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील आरोपींच्या शोधासाठी सीआयडीने मोठी कारवाई केली आहे. सीआयडीने सर्व आरोपींची संपत्ती जप्त करण्यास सुरुवात केली आहे. या हत्येच्या प्रकरणात वाल्मिक कराड हे मास्टरमाइंड असल्याचा आरोप होत आहे. अशातच भाजपाचे आमदार सुरेश धस हे मुंडेंवर वेगवेगळे खुलासे करत असून विरोधकांनीही मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केलेली आहे. अशातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुंडे यांच्यात बैठक झाली असून यात कराडच्या शरण येण्यावर निर्णय झाल्याचे समजते आहे.





वाल्मिक कराड आज पुण्यात शरण आला. CID ची पथके मागील पंधरा दिवसापासून वाल्मिकी कराड यांचा शोध घेत आहेत. परंतू तो त्यांना सापडू शकला नव्हता. वाल्मिक कराडच्या शेवटच्या लोकेशनबाबत मोठी अपडेट समोर आली होती. कराड याचे शेवटचे लोकेशन मध्य प्रदेशातील उज्जैनमध्ये होते, यानंतर त्याचा फोन बंद असल्याचे समोर आले आहे. परंतू, तो त्याच्या आकांसोबत टचमध्ये असल्याचा दावा धस यांनी केला होता. सरेंडर करण्यावरून या दोघांमध्ये वादही झाल्याचे ते म्हणाले होते.

### कोण आहेत वाल्मिक कराड?

**» वाल्मिक कराड हे राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय मानले जातात. स्वतः पंकजा मुंडे यांनी एका जाहीर सभेत त्यांच्याबद्दल बोलताना म्हटले होते, "वाल्मिक कराड यांच्याशिवाय धनंजय मुंडे यांचेही पानही हलत नाही." संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर विरोधकांकडून वाल्मिक कराड यांना लक्ष्य करण्यात आले. भ्रष्टाचारासह बीडमधील कायदा आणि सुव्यवस्थेसंबंधी काही प्रकरणे उपस्थित करून विरोधकांनी वाल्मिक कराड यांच्यावर अनेक आरोप केले आहेत.**

सीआयडीला शरण जाण्यापूर्वी कराडने एक व्हिडीओ जारी केला आहे. यामध्ये त्याने केज पोलीस स्टेशनला खोटी खंडणीची फिर्याद दाखल झाल्याचा आरोप केला आहे. मी वाल्मिक कराड. माझ्याविरोधात केज पोलीस ठाण्यात खंडणीची खोटी तक्रार दाखल झालेली आहे. मला अटकपूर्व जामिनाचा अधिकार असतानाही पुण्यातील पाषाण रोडवरील सीआयडी कार्यालयात शरण जात आहे. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात जे दोषी असतील त्यांना फाशी द्यावी. पण राजकीय द्वेषापोटी माझे नाव त्यात जोडले जात आहे. पोलीस तपासात जर मी दोषी आढळलो तर न्याय देवता जी शिक्षा देईल, ती भोगण्यासाठी मी तयार आहे, असं वाल्मिक कराडनं व्हिडीओमध्ये नमूद केलं आहे.

# पुण्यात साजरा होणार भव्य आर्मी डे

## 15 जानेवारीला संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती राहणार

**पुणे | प्रतिनिधी**

भारतीय सैन्यदलाचा 77 वा वर्धापन दिन यंदा पुण्यात साजरा होत आहे. यानिमित्त आळंदी रस्त्यावरील बॉम्बे सॅपर्स या लष्करी संस्थेच्या मैदानावर भव्य कार्यक्रम होणार आहे. यानिमित्त 3 ते 15 जानेवारीदरम्यान विविध कार्यक्रम संपन्न होत आहेत. सोमवारी याची रंगीत तालीम संपन्न झाली. ती पाहून या परिसरातील नागरिक हरखून गेले.

भारत देश स्वतंत्र होताच 15 जानेवारी 1949 रोजी भारतीय लष्कराच्या प्रमुखपदी ले. जन. के. एम. करिअप्पा यांची निवड झाली. तेव्हापासून 15 जानेवारी हा भारतीय लष्कराचा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. शहरात 15 जानेवारी रोजी होणाऱ्या कार्यक्रमास संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) अनिल चौहान, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



**कार्यक्रम पहिला : (दि.3 ते 5)**

दक्षिण कमांड येथे 3 ते 5 जानेवारीदरम्यान आर्मी मेळ्याचे आयोजन केले आहे. सकाळी 9 ते सायंकाळी 5 पर्यंत प्रवेश खुला राहणार आहे.

**दुसरा कार्यक्रम : (दि. 7 ते 15)**

आळंदी रस्त्यावरील बॉम्बे सॅपर्स या सैन्यदलाच्या मैदानावर लष्कराच्या वतीने संचलनासह अत्याधुनिक शस्त्रांचे विलोभनीय दर्शन होणार आहे. तसेच, लष्कराच्या वतीने मिशन ऑलिम्पिकसारखे सजीव देखावे साकारणारे रथ या ठिकाणी पाहावयास मिळणार आहेत.

### सोमवारी झाली रंगीत तालीम

**» आळंदी रस्त्यावरील बॉम्बे सॅपर्सच्या मैदानावर सोमवारी लष्कराच्या वतीने या संपूर्ण कार्यक्रमाची रंगीत तालीम सादर करण्यात आली. यात लष्कराचे बहारदार संचलन, अत्याधुनिक लष्करी वाहने, हेलिकॉप्टर, रोबोटिक श्वान यांचा यात समावेश होता. या वेळी या भागातील स्थानिक आबालवृद्धांना प्रवेश देण्यात आला होता. लष्करीसामर्थ पाहून लोक भारावून गेले.**

**सामान्य नागरिकांसाठी ॲपवरून नोंदणी**

हा सोहळा पाहण्यासाठी लष्कराने सामान्य नागरिकांनाही संधी दिली आहे. या मैदानाची क्षमता केवळ बाराशे लोकांची आहे. त्यामुळे या ठिकाणी प्रवेश देण्यासाठी एक ॲप तयार करण्यात येत असून, ते 1 जानेवारी रोजी खुले केले जाणार आहे. त्यावर नागरिकांनी अर्ज भरून दिल्यावरच त्यावर प्रवेशिका पाठवली जाईल, अशी माहिती लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली.

# पालिका पर्यावरण विभाग ॲक्शन मोडवर

## प्रदूषण कमी करण्यासाठी विविध उपाययोजनांवर भर : प्रदूषण करणाऱ्यांवर होणार फौजदारी कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात वायू, ध्वनी, नदीचे जलप्रदूषण वाढले आहे. दिवसेंदिवस धुळीचा त्रास वाढतच आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. शहरात स्वच्छ व शुध्द हवा करण्यात येत आहे. मात्र, हवा, ध्वनी, जलप्रदूषण करणाऱ्यांवर सुरुवातीला दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच वारंवार सूचना करूनही प्रदूषण करणाऱ्यांवर वेळ प्रसंगी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा महापालिका अधिकाऱ्यांनी दिला आहे.



हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी शहरात अनेक चौकात एअर प्युरिफिकेशन सिस्टीम बसविण्यात आली आहे. सभोवतालची हवा स्वच्छ करण्यासाठी व हवा गुणवत्ता निर्देशांक सुधारण्यासाठी या पद्धतीचा उपयोग होतो. यामुळे चौकातील ५० मीटर त्रिजेमधील वायुप्रदूषण कमी जात आहे. नऊ पातळ्यांवर गाळण्याची प्रक्रिया पद्धत वापरली जात आहे. सभोवतालच्या हवेचे ऑनलाइन निरीक्षण करण्याची सुविधा दिली आहे.

शहरात ड्राय मिस्ट बेस्ड फाउंटन सिस्टीम ही यंत्रणादेखील २३ ठिकाणी बसविण्यात आली आहे. या यंत्रणेद्वारे उच्चदाब पंप व विशेष नोजल वापरून धुके तयार करण्यात येतात. हवेतील धूलिकण जड बनवून कमी केले जात आहेत. ते जमिनीवर खाली आणले जाते. त्यामुळे जवळच्या भागात कण उडण्यास प्रतिबंध होतो. हवेची आर्द्रता, तापमान कमी होते. वातावरण थंड राहण्यास मदत होते.

तसेच शहरात वाहनांमधून निघणार धूर, हवेतील धूलिकण यामुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी स्टेशनरी फॉग कॅननची पाच वाहने मोशी कचरा डेपो येथे कार्यान्वित आहेत. धूळ व गंध नियंत्रणासाठी वॉटर मिस्ट टेक्नॉलॉजी अंतर्गत ती डिझाइन केली आहेत. ही वाहने हवेतील धूळ कमी करतात. पोर्टेबल असल्याने कोणत्याही ठिकाणी ही वाहने ओढून नेता येऊ शकणारी आहेत.

शहरातील १८ मीटर व त्यापेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांवर ट्रक मॉन्टेड फॉग कॅनन या पाच वाहनांद्वारे पाण्याचे तुषार उडवून हवेतील धूळ व धूर कमी केला जात आहे. वॉटर मिस्ट तंत्रज्ञान वापरून मोबाईल डस्ट स्प्रेशन व्हेईकल म्हणून डिझाईन केलेले हे वाहन आहे.

रस्त्यांवरील जंक्शन, इमारती पडणे, कचराकुंड्यांच्या परिसरातील हवेतील धूळ नियंत्रित करण्यासाठी ही वाहने वापरली जातात. तसेच, झाडांवर साचलेली धूळ ही या वाहनांद्वारे पाण्याचे तुषार फवारून खाली बसविली जात आहे.

रोड वॉशरच्या दोन वाहनांद्वारे शहरातील १८ मीटर व त्यापेक्षा अधिक रुंदीचे रस्ते साफ केले जात आहेत. बांधकाम राडारोडा वाहतूक करणाऱ्या वाहनांतून पडलेली माती व चिखल या वाहनांद्वारे साफ केली जाते. एका शिफ्टमध्ये ४० किलोमीटर अंतराचा रस्ता धुऊन घेतला जातो. रस्त्यांसोबत पुतळे व उपकरणे धुण्यास हे वाहन वापरले जात आहे. या सर्व वाहनांना किलोमीटरनुसार पैसे दिले जातात.

या सर्व वाहने व कामासाठी ३० कोटींपेक्षा अधिकचा खर्च महापालिकेने केला आहे. त्याद्वारे शहरातील वायुप्रदूषण कमी करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. मात्र, असे करूनही प्रदूषण कमी होत नसल्याचे महापालिका ॲक्शन मोडमध्ये आली आहे. शहरात प्रदूषण करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई तीव्र केली आहे. प्रसंगी फौजदारी गुन्हे नोंदविण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे.

### शहरात रात्रीच्या वेळेत बांधकामास बंदी

**» शहरात रात्री १० ते सकाळी ७ या वेळेत बांधकाम करण्यास बंदी घालण्यात आली आहे. वायू व ध्वनिप्रदूषण होत असल्याने महापालिकेने हा निर्णय घेतला आहे. हा नवीन नियम बांधकाम परवानगी विभागाने लागू केला आहे. नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. प्रदूषण करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी दोन खासगी एजन्सींचे चार पथके शहरात दिवस-रात्र फिरत आहेत. त्या पथकांकडून दंडात्मक कारवाई केली जात आहे. ही मोहीम तीव्र करण्यात आली आहे.**

# पीएमआरडीएकडून वर्षभरात 350 बांधकामांचे सर्वेक्षण

## अनधिकृत असलेली सुमारे 95 बांधकामे, होर्डिंग हटविण्याची कार्यवाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) वतीने अनधिकृत बांधकामे, होर्डिंग हटविण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. पीएमआरडीए प्रशासनाच्या गेल्या वर्षभरात सुमारे 350 बांधकामांचे सर्वेक्षण केले आहे. यामध्ये अनधिकृत असलेली सुमारे 95 बांधकामे, होर्डिंग हटविण्याची कार्यवाही प्रशासनाने केली आहे. त्यामध्ये 24 होर्डिंगचा समावेश आहे. यापुढेही ही कारवाई सुरुच ठेवली जाणार आहे. त्याचप्रमाणे, बांधकामांचे सर्वेक्षणदेखील केले जाणार आहे, असे पीएमआरडीए प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.




दरम्यान, नोटीस दिल्यानंतरही बांधकाम सुरू ठेवून नियमभंग करणाऱ्या 5 जणांवर फौजदारी कारवाई केली आहे. येथून पुढे अनधिकृत बांधकामांच्या विरोधात कारवाई आणखी तीव्र करण्यात येणार आहे. पीएमआरडीए हद्दीतील सर्व अनधिकृत होर्डिंगसह अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण सुरू आहे. तसेच, अशी अनधिकृत बांधकामे हटविण्याची कारवाई करण्यात येत असल्याचे अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाच्या सह-आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले.

पीएमआरडीए प्रशासनाने यापूर्वी लोणीकंद, केसनंद येथील अनधिकृत होर्डिंगसह बांधकाम काढून टाकले होते. त्याचप्रमाणे, अनधिकृत होर्डिंग, सोसायटीतील सदनिकाधारकांनी अनधिकृतपणे केलेले पत्राशेड क्रेन, गॅस कटर आणि मनुष्यबळाच्या साहाय्याने काढण्यात आले.

पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, पोलीस अधीक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हाधिकारी डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील, उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे, तहसीलदार सचिन मस्के, राजेंद्र रांजणे, पोलिस निरीक्षक महेशकुमार सरतापे, कनिष्ठ अभियंता यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली कारवाई केली जात आहे.

# अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

## विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी आषाढी वारी सोहळ्याच्या धर्तीवर सुविधा पुरविण्यात येणार

**पुणे | प्रतिनिधी**

‘कोरेगाव भीमा येथील विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी आषाढी वारी सोहळ्याच्या धर्तीवर सुविधा पुरविण्यात येणार आहे. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणांचे चोख नियोजन करण्यात आले असून, यंत्रणा सज्ज झाली आहे,’ अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी सोमवारी दिली.



कोरेगाव भीमा विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी दरवर्षी लाखो अनुयायी येत असून, गेल्या काही वर्षांपासून अनुयायांच्या संख्येत वाढ होत आहे. मंगळवार (३१ डिसेंबर) आणि बुधवार (एक जानेवारी) असे दोन दिवस होणाऱ्या सोहळ्यासाठी जवळपास आठ ते दहा लाख अनुयायी येणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाकडून सुविधांचे नियोजन करण्यात आल्याचे डॉ. दिवसे यांनी सांगितले. या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील उपस्थित होत्या.

डॉ. दिवसे म्हणाले, ‘दर वर्षी आषाढी वारी सोहळ्यासाठी वारकरी आणि भाविकांच्या दृष्टीने ज्या सुविधा पुरविल्या जातात, त्याच धर्तीवर यंदाच्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यात अनुयायांसाठी सुविधा पुरविण्यात येणार आहेत. त्यासाठी महसूल विभाग, पोलीस विभाग, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपी), राज्य परिवहन महामंडळ (एसटी), अन्न व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), समाजकल्याण विभाग, महावितरण, आरोग्य विभाग, माहिती व जनसंपर्क कार्यालय यांच्यासह विविध विभागांच्या साहाय्याने सोहळ्याचे नियोजन करण्यात आले आहे.’

‘अनुयायांना विजयस्तंभाच्या परिसरापर्यंत प्रवास करण्यासाठी आणि पुन्हा नियोजितस्थळी जाण्यासाठीची वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षा यंत्रणा या दोन गोष्टींचे नियोजन करण्यात आले आहे. बुधवारी ५७५, तर गुरुवारी एक हजार ७० मोफत बस ठेवण्यात आल्या आहेत. वाहनांसाठी ४५ ठिकाणी वाहनतळ निश्चित करण्यात आले आहेत. तसेच बसचे मार्ग निश्चित करण्यात आले असून, नियंत्रण कक्ष तयार करण्यात येणार आहे. महिला सुरक्षितता आणि इतर घटनांच्या अनुषंगाने प्रत्येक बसमध्ये सीसीटीव्ही कार्यरत करण्यात आले आहेत,’ असे डॉ. दिवसे यांनी स्पष्ट केले.

‘नियोजनासाठी प्रत्येक विभागातील व्यक्तीची नेमणूक करून नियंत्रण समिती, राजशिष्टाचार समिती, नियोजन समिती, रंगमंच समिती, पास समिती, बुक स्टॉल समिती आदी समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत, तर प्रमुख १७ अधिकाऱ्यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे या प्रशासकीय समितीच्या सदस्य सचिव असणार आहेत,’ असे त्यांनी सांगितले.

### ‘आरोग्यदूत’द्वारे तत्काळ आरोग्य सेवा

» यंदाच्या सोहळ्यात अनुयायांच्या आरोग्याच्या दृष्टीने ‘आरोग्यदूत’ ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. त्यासाठी दुचाकीवरील आरोग्यदूत तत्काळ आरोग्य सेवा देतील, तर आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य तपासणी कक्ष (ओपीडी), २३ आरोग्य केंद्रे, ४३ रुग्णवाहिका विविध ठिकाणी असतील. तसेच महिला व स्तनदा मातांच्या अनुषंगाने ९ हिरकणी कक्ष आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ७ ठिकाणी निवारा केंद्र उभारणी करण्यात आली आहे.

### सुरक्षिततेसाठी यंत्रणा

» सोहळ्यातील अनुयायांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने भीमा नदीच्या वाहतूक पुलावरील कठड्यांवर जाळ्या उभारण्यात आल्या आहेत. तसेच, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची एक तुकडी तैनात करण्यात येणार असून, चार बोटी सुसज्ज ठेवण्यात येणार आहेत. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्याकडून ४४ अग्निशमन वाहने तैनात करण्यात आली आहेत.

# वातावरण बदलाचा अंजीरबागांवर परिणाम

## पुरंदरमधील शेतकरी चिंताग्रस्त : थंडीचा मोठा फटका अंजीर उत्पादक शेतकरीवर्गाला

**पुणे | प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून बदलत्या वातावरणाचा तसेच थंडीचा मोठा फटका अंजीर उत्पादक शेतकरीवर्गाला बसला आहे. वातावरणातील बदलामुळे अंजीरफळाचा कडकपणा जाऊन, अंजीरफळाची साल सैल पडून अंजीर उकलत आहे. तसेच, अंजीरफळाची गोडी कमी होऊन अंजीर खराब निघत आहेत. यामुळे फळ पिवळे पडून गळू लागले आहे. यामुळे अंजीर उत्पादकांचे मोठे नुकसान होत असून, ते आर्थिक संकटात सापडत आहेत.



ढगाळ हवामानामुळे अंजीरफळे उकलत असून, गोडी देखील कमी होत आहे. अशा ढगाळ हवामानामुळे एकाच वेळी क्षमतेपेक्षा जास्त उत्पादन निघत आहे. परिणामी, अंजीर उकलले गेल्याने बाजारभावात देखील कमालीची घसरण झाली आहे.

वाल्हे नजीक आडाचीवाडी (ता. पुरंदर) परिसरातील शेतकऱ्यांचे अंजीर हे प्रमुख पीक आहे. परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर अंजिराच्या फळबागा आहेत. हमखास उत्पन्न मिळवून देणारे हे पीक असल्याने याचे उत्पादन चांगल्या पद्धतीने घेतले जाते.

यावर्षी अल्प प्रमाणात पाऊस पडल्याने अगोदर पाणीटंचाईचा सामना करत असलेल्या शेतकरीवर्गासमोर आता पुन्हा बदलत्या हवामानाचा परिणाम अंजिराच्या बाजारपेठेवर झाला आहे. हजारो रुपये खर्च करीन देखील कमी प्रमाणात आर्थिक उत्पन्न येत नसल्याने शेतकरीवर्गात असमाधानकारक वातावरण असल्याचे सूर्यकांत पवार, आदी उत्पादक शेतकऱ्यांनी सांगितले.

### उत्पादनामध्ये 50 ते 60 टक्के घट

» अंजिराच्या उत्पन्नामध्ये जवळपास 50 ते 60 टक्क्यांपेक्षा अधिक घट होत असून, अंजीर उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. बागांवर झालेला खर्च देखील निघेनासा झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडून शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान होत असल्याचे अंजीर उत्पादक संभाजी पवार, प्रशांत पवार, महेश पवार यांनी सांगितले.